सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी समग्र शिक्षा अभियान (सर्व शिक्षा अभियान) कार्यक्रमासाठी दुसऱ्या व तिसऱ्या अंतिम हप्त्याचा निधी (अनुसूचित जाती उपयोजना हिस्सा) वितरीत करणेबाबत. (केंद्र व राज्य हिस्सा).

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएसए-२०१८/प्र.क्र.१५० भाग-२/एस.डी-१
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३१ मार्च, २०१९

वाचा :-

१) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-२०००/(२७४०)/प्राशि-१, दि.१८/०१/२००२
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थस-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८
३) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक : ७-१/२०१८-IS-१२ (SC), दि.१३/०२/२०१९
४) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक : ७-१/२०१८-IS-१२ (SC), दि.०१/०३/२०१९
५) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक : ७-१/२०१८-IS-१२ (SC), दि.२६/०३/२०१९

प्रस्तावना:-

समग्र शिक्षा अभियान (सर्व शिक्षा अभियान) योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिस्स्याचे प्रमाण (केंद्र : राज्य) ६०:४० असे आहे. केंद्र शासनाने दिनांक ०१/०३/२०१९ व दि.२६/०३/२०१९ रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अंतिम हप्त्याचा अनुसूचित जाती उपयोजना (SCP) (अनावर्ती) निधी रु.४,०७,६४,०००/- (रु.चार कोटी सात लाख चौसष्ट हजार फक्त) व रु.१२,५९,००,०००/- (रु.बारा कोटी एकोणसाठ लाख फक्त) अनुसूचित जाती उपयोजना (SCP) (आवर्ती) निधी असा एकूण रुपये १६,६६,६४,०००/- (रुपये सोळा कोटी सहासष्ट लाख चौसष्ट हजार फक्त) इतका निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा केलेला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याचे वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने संदर्भ क्र.१६३/अर्थोपाय, दिनांक २८/०३/२०१९ व क्र.१७२/अर्थोपाय, दि.२९/०३/२०१९ अन्वये अभिप्राय दिले आहेत. केंद्र शासनाच्या निधीच्या ४०% प्रमाणात राज्य हिस्सा रु.२,७१,७६,०००/- (अनावर्ती)+रु.८,३९,३३,३३३/- (आवर्ती) असा रु.११,११,०९,३३३/-इतका येतो.

उपरोक्त प्रमाणे वितरीत केलेल्या निधीच्या प्रमाणात केंद्र हिस्सा लेखाशिर्ष (२२०२।०७६) या लेखाशिर्षाखाली व केंद्र हिस्स्याशी समरुप राज्य हिस्सा लेखाशिर्ष (२२०२३०८३) या लेखाशिर्षाखाली पुरेशी तरतूद उपलब्ध नाही. सद्य:स्थितीत उपरोक्त लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतूद विचारात घेऊन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

समग्र शिक्षा अभियान (सर्व शिक्षा अभियान) अंतर्गत प्राथमिक शिक्षणाकरिता रु.१७,९२,३६,९८३/- (रुपये सतरा कोटी ब्यान्नव लाख छत्तीस हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) इतका निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे खालीलप्रमाणे वितरीत करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पिय तरतूद	वितरीत तरतूद	
१	२	३	४	
			आवर्ती	अनावर्ती
१	"मागणी क्र. ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ७८९, अनुसूचित जाती उप योजना, (०१) (०१) सर्व शिक्षा अभियान (अनुसूचित जाती उप योजना) (केंद्र हिस्सा), (२२०२ आय ०७६), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)"	रु.१३० कोटी	रु.६,९८,६४,३०३/-	रु.३,३४,३९,४१२/-
२	"मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०० इतर खर्च, (००) (०६), सर्व शिक्षा अभियान योजना (विशेष घटक योजना) (केंद्र पुरस्कृत योजना) (२२०२ ३०८३), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)"	रु.८५ कोटी	रु.५,१३,५३,६७०/-	रु.२,४५,७९,५९८/-
		एकूण	रु.१२,१२,१७,९७३/-	रु.५,८०,१९,०१०/-
		एकूण	रु.१७,९२,३६,९८३/-	

३. उपरोक्त प्रमाणे वितरित करण्यात आलेल्या रकाना क्र. ४ येथील निधीचा खर्च रकाना क्र.२ मध्ये नमुद केलेल्या लेखाशिर्षातून सन २०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. वित्त विभागाच्या दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबींची पूर्तता होत आहे.

५. सदर शासन निर्णयान्वये वितरित केलेला निधी उपरोक्त संदर्भाधीन केंद्र शासनाचे दि.०१/०३/२०१९ व दि.२६/०३/२०१९ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या निदेशानुसार खर्च करावा. तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावा.

६. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ च्या शासन परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, यांना "आहरण व संवितरण अधिकारी" तर सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.०२/०४/२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये, वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.१६३/अर्थोपाय, दिनांक २८/०३/२०१९ व क्र.१७२/अर्थोपाय, दि.२९/०३/२०१९ अन्वये व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३३११२५९०४२९२१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2019.03.31 13:02:02 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
९) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ६३
१०) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
११) वित्त विभाग, (व्यय-५ / अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई
१२) अवर सचिव / कक्ष अधिकारी, रोख शाखा/ अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई
१३) निवड नस्ती (एस.डी.१)